**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २७२ । बुधवार २९ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## एकाच दिवसात ४४६ वाहनांवर कारवाई, चार लाखांचा दंड वसूल





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरात वाढत्या वाहतूक नियमभंगाला आळा घालण्यासाठी अहिल्यानगर शहर पोलीस उपविभागाने २८ जुलै रोजी धडक मोहीम राबवली. अचानक लावलेल्या नाकाबंदीदरम्यान वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या तब्बल ४४६ वाहनचालकांवर मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून ३ लाख ९१ हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. ■ पान ४ वर

### लहान मुलांकडे वाहने देऊ नका

शहर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांनी नागरिकांना, विशेषतः पालकांना, वाहतुकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आणि अल्पवयीन मुलांना वाहने न देण्याचे आवाहन केले आहे. तसेच, अहिल्यानगर शहरात यापुढेही अशा प्रकारची कारवाई अधिक तीव्र स्वरूपात सुरूच राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## घासगल्ली येथील घरसंसार दुकानात ग्राहकाला मारहाण

### दुकानदारासह चौघांवर कोतवालीत गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बाटली बदलून देण्याच्या कारणातून दुकानदाराने ग्राहकाला लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार घासगल्लीतील एस के घरसंसार सेल या दुकानात काल, मंगळवारी रात्री घडला. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांजणांवरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घासगल्लीतील नवीपेठ कॉर्नरवर एस. के. घरसंसार सेल नावाचे दुकान असून, गृहोपयोगी वस्तू येथे मिळतात. एका ग्राहकाने येथून नेलेल्या पाण्याच्या बाटलीमध्ये (वॉटरबॅग) दोष आढळून आल्याने ही काचेची बाटली बदलून देण्याची मागणी संबंधित ग्राहकाने दुकानदार इमाम कमरूद्दीन सय्यद याच्याकडे केली. त्यावेळी त्या दोघांमध्ये बोलाचाली होऊन वाद सुरू झाला. यावेळी दुकानदार इमाम कमरुद्दीन सय्यद, असीम कमरुद्दीन सय्यद, साकीर सलीम शेख व इतर एक याचौघांनी मिळून ग्राहकाला लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. यावेळी ग्राहकाच्या समवेत असलेल्या महिलेने वाद मिटविण्याचा ■ पान ४ वर

### सेवाभावी संस्थेची जागा

दुकानासाठी खासगी व्यक्तीला एस.के. घरसंसार या दुकानासाठी भाड्याने दिलेली जागा नगर शहरातील एका सेवाभावी संस्थेची आहे. परंतु सेवाभावी संस्थेला अशा प्रकारे खासगी व्यक्तीला दुकानासाठी जागा भाड्याने देता येत नाही. दुकानदाराच्या मुजोरीमुळे या दुकानात ग्राहकांसोबत असे वादावादीचे प्रसंग यापूर्वीही घडले आहे. धर्मादाय आयुक्तांनी अशा प्रकारे भाडेतत्त्वावर दिलेल्या जागेबाबत कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे.

## जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थानाला तीन कोटी रुपये निधी मिळणार

### महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश । भाविकांकडून स्वागत आणि आनंद



**मुंबई । वृत्तसंस्था–** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत आणि जामखेड तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ विकास योजना (ब वर्ग) अंतर्गत भरीव आर्थिक निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थानाला (जवळा) तीन कोटी रुपयांचा निधी प्राप्त होत आहे. २९ जुलै, २०२६ रोजी ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: तीर्थवि–२०२६/ई–१७७३६८५/यो–११ अन्वये श्री जवळेश्वर देवस्थानासाठी प्रसादालय इमारत बांधकाम निधी अंदाजपत्रकीय रक्कम ५ कोटी ८० लाख २६ हजार १७१ रुपये पैकी ३ कोटी रुपये रकमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

त्याचप्रमाणे कर्जत–जामखेड तालुक्यांतील अन्य देवस्थानांनाही लवकरच निधी वितरित केला जाणार आहे. जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थान (जवळा) या तीर्थक्षेत्राला क वर्गातून ब वर्ग तीर्थक्षेत्राचा अधिकृत दर्जा बहाल करण्यात यावा यासाठी, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यानुसार यापूर्वीच या तीर्थस्थानाला क वर्गातून ब वर्गाचा दर्जा बहाल करण्यात आला. आता श्री जवळेश्वर देवस्थानाला (जवळा) तीन कोटी रुपयांचा भरीव निधी देखील प्राप्त झाल्याने समस्त भाविकांनी या निर्णयाचे स्वागत करीत देवस्थान विकास कार्याला प्रारंभ होणार असल्याने आनंद व्यक्त केला आहे.

या देवस्थानासाठी भरीव निधी वितरित झाल्याने आता भाविकांच्या सुविधेसाठी प्रसादालय इमारत बांधकामास गती मिळणार आहे. ■ पान ४ वर

## जिल्ह्यात १० अवैध दारू विक्रेते, ११ अवैध जुगार अड्ड्यांवर छापे

### एलसीबीच्या छाप्यात सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने तोफखाना, भिंगार कॅम्प, अकोले आणि शेवगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकून एकूण २१ गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत १ लाख ३२ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

एसपींच्या आदेशानुसार पोनि संतोष मुटकुळे यांनी उपनिरीक्षक ■ पान ४ वर

## श्रीरामपूर परिसरातील अवैध धंद्यांवर एलसीबीकडून छापे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने श्रीरामपूर शहर परिसरात अवैध धंद्यांवर कारवाई करून आठ जणांवर गुन्हे दाखल केले या कारवाईत एकूण १३ लाख ९७ हजार ८३५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, ■ पान ४ वर

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणारे ४ आरोपी ताब्यात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करून शहरात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असणाऱ्या ४ आरोपींना गजाआड केले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील पथक २८ जुलै रोजी हद्दपार आरोपींची तपासणी करत होते. दरम्यान, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोध घेऊन सलमान उर्फ साहिल रफीक शेख (वय २५, रा. कापूरवाडी), अभिषेक गोरख घाडगे (वय २०, रा. कापूरवाडी), हर्षवर्धन अरुण तापकीर (वय २५, रा. बुऱ्हाणनगर) व गणेश विठ्ठल आव्हाड (वय २७, रा. बोल्हेगाव/नवनागापूर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

अभिलेखाची पडताळणी केली असता, उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी १ ते ३ क्रमांकाच्या आरोपींना ६ महिन्यांसाठी, तर ४ क्रमांकाच्या आरोपीला २ वर्षांसाठी नगर जिल्ह्यातून हद्दपार केले असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी सलमान शेख, अभिषेक घाडगे व हर्षवर्धन तापकीर यांच्याविरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात, तर गणेश आव्हाड याच्याविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## अहिल्यानगर महापालिकेची सिंगल युज प्लास्टिकविरोधात कारवाई

### प्लास्टिक वापरणाऱ्या दुकानदारांकडून ५५ हजारांचा दंड, ३६५ किलो प्लास्टिक जप्त । प्लास्टिकमुक्त शहरासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा – आयुक्त यशवंत डांगे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार शहरात सिंगल युज प्लास्टिकविरोधात विशेष धडक मोहीम राबविण्यात येत असून, प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाईसह प्लास्टिक जप्तीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी विविध भागांत धाडी टाकून कारवाई करत असून, गेल्या महिनाभरात ५५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून तब्बल ३६५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

यासोबतच शहरात रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर तसेच महापालिकेच्या परवानगीशिवाय रस्ते खोदून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी महापालिकेने ही मोहीम अधिक तीव्र केली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शासनाने सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालूनही काही दुकानदार, व्यापारी आणि भाजी विक्रेते सर्रासपणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महापालिकेच्या स्वच्छता विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेत संबंधितांकडून दंड वसूल करून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त केले.

ही कारवाई मुख्य स्वच्छता निरीक्षक प्रशांत रामदीन स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब विधाते, सुरेश वाघ, ऋषिकेश भालेराव, ऋषिकेश वाल्मीक, संदीप चव्हाण, प्रसाद उमाप, प्रशांत चांदणे, राजेंद्र सामन आणि शुभम उपलंची यांनी केली.

शासनाचा प्लास्टिक बंदीचा आदेश असून प्लास्टिकमुक्त शहर घडविण्यासाठी सर्वप्रथम शहरातील व्यावसायिक, व्यापारी, दुकानदार आणि भाजी विक्रेत्यांनी पुढाकार घेत प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करून कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले. ते म्हणाले, ‘‘प्लास्टिकमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असून नागरिकांच्या आरोग्यावरही त्याचा विपरीत परिणाम होतो. काही नागरिक घंटागाडीत कचरा न टाकता तो रस्त्यावर फेकतात. नागरिकांनी आपला कचरा घंटागाडीतच टाकून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे. तसेच महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता सार्वजनिक रस्ते खोदून शहराचे विद्रूपीकरण करणारे प्रकार टाळावेत. असे कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

## लायन्स इंटरनॅशनलच्या युवा सांस्कृतिक देवाणघेवाण उपक्रमांतर्गत परदेशातील चार युवा प्रतिनिधी अहिल्यानगरात

### श्री विशाल गणपतीचे दर्शन घेऊन विविध ठिकाणी भेट; नगरकरांच्या पाहुणचाराने भारावले; भारतीय संस्कृतीचा घेत आहेत प्रत्यक्ष अनुभव । लायन्स क्लब ऑफ अहमदनगरने स्विकारले यजमानपद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लायन्स इंटरनॅशनलच्या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित इंटरनॅशनल यूथ एक्स्चेंज प्रोग्राम अंतर्गत तुर्कस्तान, बेल्जियम, डेन्मार्क आणि हंगेरी या चार देशांतील युवा प्रतिनिधी सध्या अहिल्यानगरात वास्तव्यास असून भारतीय संस्कृती, परंपरा, अध्यात्म, सामाजिक जीवन आणि कौटुंबिक मूल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत. या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाचे यजमानपद लायन्स क्लब ऑफ अहमदनगर यांनी स्वीकारले असून, लायन्स मल्टिपल डिस्ट्रिक्टच्या यूथ एक्स्चेंज चेअरमन लायन दिपेश जोशी (मुंबई) व लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजीतसिंग वधवा यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमात तुर्कस्तान (इस्तंबूल) येथील अभिनेत्री डेफ्ने एर्सेन , बेल्जियमची ईव्हा–लुना बेलॉय , डेन्मार्कचा एलियट केलर लॉरिट्झेन आणि हंगेरीचा फाबोक मॅत्यास हे चार युवा प्रतिनिधी या उपक्रमाह सहभागी होवून शहरात दाखल झाले आहेत.

भारतीय संस्कृतीचा जवळून अनुभव मिळावा या उद्देशाने प्रत्येक प्रतिनिधीचा मुक्काम स्थानिक लायन्स सदस्यांच्या कुटुंबात ठेवण्यात आला आहे. डेफ्ने एर्सेन या हरजीतसिंग वधवा यांच्या कुटुंबात, ईव्हा–लुना बेलॉय या सी.ए. राजेंद्र काळे



यांच्या कुटुंबात, एलियट केलर लॉरिट्झेन हे लायन सुनील छाजेड यांच्या कुटुंबात, तर फाबोक मॅत्यास हे लायन किरण भंडारी यांच्या कुटुंबात वास्तव्यास आहेत. भारतीय कुटुंबासोबत राहून ते येथील जीवनपद्धती, खाद्यसंस्कृती, सण–उत्सव आणि सामाजिक परंपरा समजून घेत आहेत.

अहिल्यानगरातील वास्तव्यात या युवा प्रतिनिधींनी पुणे शहरासह परिसरातील विविध ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांना भेट दिली. त्यांनी अवतार मेहेर बाबा समाधीस्थळ, आनंदधाम, गुरुद्वारा भाई दयासिंगजी, ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर तसेच शहरातील इतर महत्त्वाच्या स्थळांचे दर्शन घेतले. श्री विशाल गणपती मंदिरातील पारंपरिक आरतीत सहभागी होत त्यांनी भारतीय धार्मिक परंपरेचा अनुभव घेतला. यावेळी अशोक कानडे यांनी परदेशी युवकांचे स्वागत केले. याप्रसंगी अरिहंत कोठारी, सुजल नारंग, कल्याण बागरेचा, आनंद कटारिया, डॉ. सिमरन वधवा आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीची ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये रविवार २ ऑगस्टला रंगणार 'मूड्स ऑफ किशोर' संगीतमय मैफिल!

अहिल्यानगर - भारतीय संगीतसृष्टीतील अवलिया आणि अष्टपैलू गायक किशोर कुमार



यांच्या जयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात संगीताची भव्य पर्वणी आयोजित करण्यात आली आहे. 'ऋणानुबंध' आणि ' ए.एस.पी. क्रिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता 'माऊली सभागृह' येथे ' लाईव्ह म्युझिक कॉन्सर्ट या विशेष सुश्राव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी मोफत पासची व्यवस्था करण्यात आली असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक अजित रोकडे, सारिका रघुवंशी आणी प्रशांत बंडगर यांनी केले आहे. किशोरदांच्या अफाट ऊर्जेला, भावोत्कट सुरांना आणि त्यांच्या अष्टपैलू कलाप्रवासाला उजाळा देण्यासाठी या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. या सोहळ्यात पुण्यातील प्रसिद्ध गायक व 'व्हॉईस ऑफ किशोर कुमार' म्हणून सुपरिचित असलेले राजू काजे आणि सुप्रसिद्ध गायिका वैजू चांडवले आपल्या स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. या मैफिलीत अजित रोकडे, सारिका रघुवंशी, प्रशांत बंडगर, डॉ. शैलेंद्र खंडागळे, डॉ. दमन काशीद, डॉ. गायत्री काशीद, महेश घावटे, डॉ. विवेकानंद कंगे आणि नीना सावला हे गुणी गायक साथ देणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निवेदक प्रवीण पोतदार यांचे निवेदन असणार असून, ते गाण्यांसोबतच किशोरदांच्या आयुष्यातील विविध किस्से जिवंत करणार आहेत. दिलावर शेख व सत्यजित सराफ यांच्या संगीत संयोजनाखाली मातब्बर वादकांच्या साथीने ऑक्टोपॅड, गिटार, ड्रमसेट आणि तबल्याच्या सुरांचा त्रिवेणी संगम यावेळी अनुभवायला मिळणार आहे. अहिल्यानगरकरांनी या संगीतमय सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून गाण्यांच्या या भव्य आनंदाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन 'ऋणानुबंध' आणि 'ए.एस.पी. क्रिएशन' परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी चे मोफत पासेस स्वामी समर्थ मोबाईल शॉपी पारिजात चौक गुलमोहर रोड या ठिकाणी उपलब्ध असून पासेससाठी ९४२०६३५०९६, ७३५०८८१५१५,तसेच ८९५६३६३६६८ या क्रमांकावर फोन करण्याचे म्हंटले आहे.

## अनापवाडी जिल्हा परिषद शाळेत बाल वारकऱ्यांची भक्तिमय दिंडी

**विठ्ठलनामाच्या गजरात आषाढी एकादशी उत्साहात साजरी | पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीनिमित्त अनापवाडी (ता. राहुरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल वारकऱ्यांची भक्तिमय दिंडी मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात पार पडली. वारकरी वेशभूषेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हातात टाळ, मृदुंग, भगवे ध्वज आणि तुळशीची रोपे घेऊन विठ्ठल–रुक्मिणीच्या जयघोषात दिंडी काढत परिसर भक्तिरसाने भारावून टाकला.

विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि विविध सण–उत्सवांचे महत्त्व समजावे तसेच वारकरी संप्रदायातील भक्ती, समता आणि सामाजिक ऐक्याचे संस्कार बालवयातच रुजावेत या उद्देशाने शाळेच्या वतीने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या परिसरातून निघालेल्या दिंडीत विद्यार्थ्यांनी विठ्ठलनामाचा अखंड गजर करत अभंग, हरिपाठ आणि भजनांच्या तालावर उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वारकरी वेशभूषेतील विद्यार्थी, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि पारंपरिक पोशाखातील चिमुकल्यांमुळे संपूर्ण परिसर पंढरीच्या भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. ग्रामस्थांनीही या दिंडीचे स्वागत करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील कोंडीराम माळी, उपाध्यक्ष समर्थ अनाप, रोहिदास कानडे, एजाज तांबोळी, नारायण अनाप, संदीप अनाप, विलास मोरे, कुमार अंत्रे, राजेश अंत्रे, गेनू भाऊ अनाप, संजय सजन, बाळासाहेब अनाप, अलका अनाप, धनवट मॅडम, दिघे मॅडम, सुरेखा अनाप, शुभांगी अंत्रे, शकुंतला अनाप, सविता अनाप तसेच पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंडीचे नियोजन आणि यशस्वी आयोजन करण्यासाठी विलास मोरे, चंद्रभान अनाप, संदीप अनाप, कुणाल अनाप, दिनेश अनाप आणि शुभम अनाप यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर सर्व उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शाळेचे शिक्षक वायदंडे सर आणि घोलप सर यांनी दिंडी यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणारे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, ग्रामस्थ, शिक्षक आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## तीन पिढ्यांनी जपलेले शिक्षणसंस्कार जागतिक पातळीवर गौरवले

**ऋषिकेश पाबळे यांची सिंगापूरच्या विद्यापीठात पीएच.डी.साठी निवड; बाभुळगाव खालसाच्या शैक्षणिक परंपरेचा जागतिक सन्मान**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बाभुळगाव खालसा येथील ज्येष्ठ शिक्षणप्रेमी, माजी शिक्षक ज्ञानदेव रामचंद्र पाबळे (सर) उर्फ ''बाप्पू'' यांनी तीन पिढ्यांमध्ये रुजविलेल्या शिक्षणसंस्कारांना जागतिक स्तरावर मानाचा तुरा लाभला आहे. त्यांचे नातू तथा डॉ. प्रा. मच्छिंद्र जगन्नाथ पाबळे यांचे सुपुत्र ऋषिकेश मच्छिंद्र पाबळे यांची आशियातील अग्रगण्य येथील अंतर्गत पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. त्यांचा अभ्यासक्रम १० ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणार असून ही संपूर्ण कुटुंबासाठी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

ऋषिकेश पाबळे यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत सातत्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यापूर्वी मे ते जुलै २०२३ या कालावधीत त्यांनी , () येथे तीन महिन्यांची यशस्वीरित्या पूर्ण केली होती. संशोधन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, नाविन्यपूर्ण दृष्टीकोन आणि उच्च शैक्षणिक गुणवत्ता यांच्या बळावर त्यांची जगातील प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक असलेल्या , मध्ये पीएच.डी.साठी निवड झाली आहे. ही निवड त्यांच्या परिश्रम, संशोधनातील सातत्य आणि ज्ञानाच्या शोधाची पावती मानली जात आहे.

ज्ञानदेव पाबळे (सर) यांनी जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गढी (ता. गेवराई, जि. बीड) येथे अनेक वर्षे शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य केले. शिक्षक म्हणून सेवा बजावताना त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी समाजकारणात सक्रिय सहभाग घेत बाभुळगाव खालसा येथील सरपंच तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे व्हाइस चेअरमन म्हणून उल्लेखनीय कार्य केले.

मात्र, सार्वजनिक जीवनात विविध पदांवर काम करत असतानाही त्यांनी शिक्षणालाच जीवनमूल्य मानले. आपल्या कुटुंबातील प्रत्येक मुलाने उच्च शिक्षण घ्यावे, समाजात स्वतः चे वेगळे स्थान निर्माण करावे आणि ज्ञानाच्या माध्यमातून देशसेवा करावी, हा संस्कार त्यांनी पुढील पिढ्यांवर बिंबविला. त्याच शिक्षणपरंपरेचा वारसा पुढे नेत त्यांच्या मुलांनी आणि नातवंडांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

## कौडगावच्या विकासासाठी २.५० कोटींच्या निधीची आ. विक्रमदादा पाचपुते मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त दि. २७ जुलै २०२६ रोजी कांडेकर लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत कौडगावच्या विविध विकासकामांसाठी २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य तथा खेडेगाव विकास संघटना, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब सहादू धिवर यांनी श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमदादा पाचपुते यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यावेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात कौडगाव गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सार्वजनिक,



सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कामांना प्राधान्याने निधी मंजूर करण्याची विनंती करण्यात आली. गावातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही विकासकामे अत्यंत गरजेची असल्याचे नमूद करण्यात आले.

निवेदनानुसार दलित बस्ती गावठाण येथे बुद्धविहार व सांस्कृतिक भवनासाठी १ कोटी रुपये, गावठाणातील स्मशानभूमीचे वाढीव काम व सुशोभीकरणासाठी ३० लाख रुपये, भैरवनाथ मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉकसाठी ५० लाख रुपये, लक्ष्मी माता मंदिर बांधकाम व सुशोभीकरणासाठी ३० लाख रुपये, तसेच कौडगावच्या जुन्या बाजारतळावर छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणीसाठी ४० लाख रुपये असा एकूण २ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी बाबासाहेब धिवर म्हणाले, ''कौडगावचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे. गावातील अनेक विकासकामे प्रलंबित असून ती पूर्ण करण्यासाठी शासन व लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जाईल. बुद्धविहार, सांस्कृतिक भवन, स्मशानभूमीचे सुशोभीकरण, मंदिर विकास आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ही केवळ विकासकामे नसून गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवाशी निगडित आहेत.

## सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग पुणे येथील राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर तसेच क्रांती दिनाच्या पूर्वसंध्येला पुणे येथील वानवडी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यास सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी (पुणे) येथे उत्साहात पार पडणार आहे.

मातोश्री द्रोपदा बबन पठारे चॅरिटेबल ट्रस्ट, छत्रपती शेतकरी सेना, बहुजन भूमी संघटना संचलित मानव हक्क, माहिती अधिकार, दक्ष पोलिस मित्र सहकार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा या सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, मुंबईतील प्रसिद्ध कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर, महाराष्ट्र पोलिस दलातील सोहेल काझी, सिनेचित्रपट अभिनेते गणेश पदमाळे, वानवडीच्या माजी नगरसेविका हसीना इनामदार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. राज्यभरात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण आणि जनकल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष कैलास पठारे यांनी दिली.

सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग हे गेल्या जवळपास वीस वर्षांपासून समाजहितासाठी सातत्याने कार्यरत आहेत.

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या नेवासा शाखेचे नवीन प्रशस्त जागेत स्थलांतर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बँक ऑफ महाराष्ट्रच्या नेवासे येथील शाखेचे नवीन जागेत नुकतेच स्थलांतर करण्यात आले आहे. गट नं. १११/१, सदाशिवनगर, विखोना एचपी पेट्रोल पंपासमोर, रघुजन गॅसजवळ, मु. पो. ता. नेवासा, जि. अहिल्यानगर हा या बँकेचा आता नवीन पत्ता आहे. यानिमित्त उपस्थित विविध मान्यवरांनी बँकेच्या कामकाजाचे कौतुक केले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात आमदार विठ्ठलराव लंघे पाटील अध्यक्षस्थानी होते. नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखलाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अहिल्यानगर अंचलचे अंचल प्रबंधक रवि रंजन प्रशुन यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले की, बँक ऑफ महाराष्ट्र ही अनेक वर्षांपासून सर्वसामान्य नागरिकांची अत्यंत जिव्हाळ्याची बँक आहे. या बँकेतून सामान्यांच्या विविध गरजा नेहमीच पूर्ण होण्याची खात्री असते. बँकेचे सर्व व्यवहार अत्यंत पारदर्शक स्वरूपाचे असल्याने नागरिकांचा बँकेवर मोठा विश्वास आहे.

गटविकास अधिकारी संजय लखलाल यावेळी म्हणाले की, बँक ऑफ महाराष्ट्र ही राष्ट्रीयकृत बँक असल्याने विविध सरकारी योजना या बँकेमार्फत राबविण्यात येतात. अनेक सामान्य कुटुंबे या योजनांचा लाभ घेऊन आपली प्रगती साधत आहेत.

## शहरातील धार्मिक स्थळांवरील ७ दिवसांच्या नोटिसीला स्थगिती द्या - अबू आझमी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेने रस्त्यांना अडथळा ठरणाऱ्या धार्मिक स्थळांबाबत प्रसिद्ध केलेल्या अवघ्या सात दिवसांच्या मुदतीच्या नोटिसीला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, संबंधित धार्मिक संस्था व विश्वस्तांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी किमान दोन ते तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी तसेच कायदेशीर व अधिकृत धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात यावे, अशी मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने आमदार अबू आझमी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



याबाबत समाजवादी पार्टीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी आमदार अबू आझमी यांच्याशी सविस्तर चर्चा करून शहरातील परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर आमदार आझमी यांनी हा विषय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून देत, महापालिकेकडून सुरू असलेल्या कारवाईबाबत तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली असल्याचे आबिद हुसेन यांनी सांगितले.

अहिल्यानगर महानगरपालिकेने नुकतीच शहरातील रस्त्यांना अडथळा ठरणाऱ्या मंदिर, दर्गा, मजार, चर्च, गुरुद्वारा, कबर आदी धार्मिक वास्तूंना स्वतःहून हटविणे अथवा स्थलांतरित करण्यासाठी सात दिवसांची मुदत देणारी सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध केली आहे. संबंधित मुदतीत कार्यवाही न झाल्यास अशा वास्तूंना बेकायदेशीर अतिक्रमण समजून महापालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिसीत देण्यात आला आहे.

## शब्दकोडे क्रमांक : १७



**आडवे शब्द :** १. आपला देश ३. पुरचुंडी ४. डोंगर फोडून तयार केलेला खड्डा ७. ज्याचे लाड करतात तो ८. पठाराचा पृष्ठभाग असतो ९. याक्षणी १०. कपडे वाळवण्यास वापरतात ती लाकडी ११. पाताळ १३. समीप १४. वायू १५. गाईच्या दुधापासून बनवतात १६. लीन १७. एक पांढरा पक्षी १८. व्याघ्र १९. युद्ध २०. पुन्हा २२. विशेष २३. देह २४. अंतर २५. मला २७. उजवा-विरुद्ध २९. वतन राखणारा ३१. द्वारपाल ३२. खाष्ट ३४. कर्ण ३६. कथेचा मुख्य गाभा ३९. पतीची दुसरी पत्नी ४१. श्रीकृष्णाची सखी ४२. नादमय स्वर ४३. वस्तुमान ४५. आवराआवर ४८. ताजा ४९. अर्ज

**उभे शब्द :** १. एक भारतीय व्यंजन डाळ ** २. तहसीलदार ३. साद ४. उत्तर भारतातील एक शहर ५. समूह ६. भूतांचा राजा ८. अविरत ९. एक तुरट चवीचे फळ १०. तुरुंगवास १२. मोदकात भरतात ती पूड १३. तगज - उलट लिहा १७. वृद्धी १९. मिश्रण २०. दैना २१. घड्याळाचा ठोका २२. घराणे २५. दुपार २६. बल देण्याची क्रिया २८. एक कडधान्य ३०. होकार-विरुद्ध ३३. राशींची एकूण संख्या ३५. सूट ३६. सरळ स्वभावाचा ३७. पायपोस ३८. आजार ४०. जम ४१. द्वेष ४३. बाहेर-विरुद्ध ४४. मग्न ४६. ताकद ४७. नूतन

**शब्दकोडे क्रमांक : १६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बे | ख | ब | र | ■ | क | पा | ळ | ■ | क | सा | रा |
| ता | ल | ■ | शी | त | ■ | व | ■ | खो | ड | ■ | ठ |
| ल | ब | क | ■ | क | मं | ड | लू | ■ | व | ही | ■ |
| ■ | त | ■ | ना | रा | ■ | र | ट | र | ट | ■ | सा |
| नो | ■ | कि | ■ | र | मा | ■ | मा | ती | ■ | धा | व |
| ■ | पा | र | वा | ■ | ह | ज | र | ■ | अ | ■ | का |
| सा | ■ | को | र | डा | ■ | व | ■ | म | ज | बू | र |
| ज | व | ळ | ■ | ब | रा | ■ | त | ■ | ग | ट | ■ |
| ■ | द | ■ | खा | र | ■ | पा | ल | घ | र | ■ | का |
| जा | न | व | र | ■ | टा | क | ■ | ट | ■ | ते | ल |
| डा | ■ | म | ट | की | ■ | क | स | ■ | थो | ■ | व |
| ■ | ध | न | ■ | ट | क | ला | ■ | स | र | प | ण |


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

# देशी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वाढत्या तापमानवाढीला रोखण्यासाठी देशी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धन हा एकमेव प्रभावी पर्याय उरला असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केले. तपोवन रोड येथील ज्ञानसंपदा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये आयोजित ॲड धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतील ‘‘मा. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिम‘‘ अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

उपमहापौर ॲड. जाधव म्हणाले, ‘‘मी शाळेत असताना उन्हाळ्यातील तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत असायचे. आज ते ४२ अंशांपर्यंत पोहोचले आहे. वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर पुढील पिढीसमोर गंभीर पर्यावरणीय संकट उभे राहील. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.‘‘ त्यांनी पुढे सांगितले की, मा. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या ट्री बँकमधून देशी प्रजातींची रोपे संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या नागरिकांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली जात आहेत.

यावेळी ग्रीन आर्मीचे सदस्य प्रा. हर्षल आगळे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाशी संबंधित विविध स्पर्धा व उपक्रमांची माहिती दिली.

इंजि. व ॲड. कैलाश दिघे यांनी विद्यार्थ्यांनी प्रत्येकाने एका रोपाशी मैत्री करून त्याच्या वाढीचे नियमित निरीक्षण करावे तसेच दत्तक वृक्ष संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

स्कूल कमिटीचे चेअरमन के. एम. भिंगारे यांनी या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक करून ग्रीन सिटी मोहिमेला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात देशी प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. या वृक्षांसाठी आवश्यक खड्ड्यांची व्यवस्था ग्रीन आर्मीच्या वतीने करण्यात आली.

तसेच माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना घरी लागवड करण्यासाठी प्रत्येकी एक देशी प्रजातीचे रोप भेट देण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक करण कराळे, ग्रीन आर्मी सदस्य प्रताप काळे, मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नितीन आठरे सर यांनी, सूत्रसंचालन बर्वे सर यांनी केले, तर कैलास सर यांनी आभार प्रदर्शन केले.



सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्युत रोषणाई करून स्वामींच्या गाभाऱ्यात आकर्षक सजावट करण्यात आली होती. (छाया – विजय मते)

## गुरुपौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात भक्तिमय वातावरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चॅरिटेबल ट्रस्ट, गणेश केंद्र, अहिल्यानगर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. सकाळी ८ वाजता भूपाळी आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर श्री स्वामी समर्थांच्या मूर्तीवर शोडशोपचार पूजन विधिवत संपन्न झाले. गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ या वेळेत भाविकांसाठी स्वामींच्या मूर्तीची पूजा करून गुरुपद स्वीकारण्याचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

## दै. आकर्षण निवडक

### लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव साजरा



अहिल्यानगर- भारतीय संस्कृतीत गुरुला अतिशय महत्व आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक ज्ञानाची शिदोरी आणि संस्कार गुरुकडून शिष्याला मिळते. अशा गुरुप्रती कायम कृतज्ञ रहायला हवे असा संदेश देत लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या इमारत कंपनी, सारसनगर धर्माधिकारी मळा व नवले नगर या चारही शाखांमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरु पौर्णिमेनिमित्त लिटिल फ्लॉवर प्री स्कूलध्ये चिमुरडयांनी विविध धर्माच्या धर्मगुरुंची वेशभूषा परिधान करून नाटिका, गाणे, पौराणिक कथा, संगीत नृत्य असे कलाविष्कार सादर केले. महर्षी व्यास, महाभारतातील एकलव्य व गुरु द्रोणाचार्य या गुरुशिष्याचे नाते, जैन धर्मातील गुरु व नवकार महामंत्र तसेच अन्य धर्मातील गुरुंविषयी कार्यक्रम सादर करण्यात आले.संचालिका मनिषा बोगावत म्हणाल्या, गुरु पौर्णिमा हा गुरुप्रती निष्ठा व कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शाळेत मुलांच्या मनावर लहान वयापासूनच जीवनातील गुरुच महत्वपूर्ण स्थानाविषयी मार्गदर्शन केले जाते. मुलांनी गुरुपौर्णिमा साजरी करताना अतिशय उद्बोधक कार्यक्रम सादर केले. गुरु साक्षात परब्रम्ह या विषयावर गायन सादर करण्यात आले. गुरू आपल्याला जे ज्ञान देतात ते आपल्या आयुष्याला दिशा देणारे असते. गुरुच्या मार्गदर्शनामुळे शिष्य कोणत्याही अडचणीचा यशस्वीपणे सामना करून सकारात्मक ऊर्जा मिळवू शकतो, असा संदेश यानिमित्त देण्यात आला. विशाल बोगावत यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी चारही शाळांतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

### भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशी निमगाव वाघात उत्साहात साजरी



अहिल्यानगर - आषाढी एकादशीनिमित्त नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गावातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसर ‘विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल...’ या नामगजराने दुमदुमून गेला असून संपूर्ण गावात भक्ती आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विधीवत पूजा करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने पूजा, आरती आणि अभिषेक करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी सुख-समृद्धी, चांगले आरोग्य आणि समाजात शांतता व ऐक्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात आली.या धार्मिक कार्यक्रमास विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, पिंटू जाधव, सिताराम फलके, ज्ञानदेव कापसे, गोरख फलके, डॉ. संदीप जाधव, अरुण काळे, भाऊसाहेब कापसे, शिक्षिका जयमाला, छगन भगत यांच्यासह ग्रामस्थ, वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत भक्तिभावाने आरतीत सहभाग नोंदविला. आषाढी एकादशीचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक भाविकांनी उपवास, नामस्मरण, हरिपाठ आणि भजन-कीर्तनाद्वारे आपली भक्ती व्यक्त केली. मंदिर परिसर आकर्षक सजावटीने नटला होता. सकाळपासूनच दर्शनासाठी महिलांसह ज्येष्ठ नागरिक, युवक आणि महिलांनी गर्दी केली होती. वारकरी संप्रदायाची परंपरा जपत गावात भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने ग्रामस्थांनी एकमेकांना शुभेच्छा देत विठ्ठल नामाचा गजर केला.

# प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुची कृपा होणे आवश्यक – पूज्य प्रविणऋषीजी महाराज

### आनंदधाम परिसरात समर्पण चातुर्मास २०२६ ला उत्साहात प्रारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आचार्यश्रींची गुरूकृपा झाली आणि मी घडत गेलो. प्रवर्तकश्रीजी याचे साक्षी आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेले ज्ञान क्षणोक्षणी आठवते. त्यामुळे गुरूकृपा प्रत्येकासाठी महत्वाची असते. आयुष्य सुरू होते श्वासपासून. जन्माला आल्यावर श्वास घेण्यासाठी बाळ स्वतः रडते किंवा त्याला रडवले जाते. दुसरे आयुष्य तेव्हा सुरू होते जेव्हा मनात गुरूकृपेची आस निर्माण होते. गुरूंचे आशीर्वाद ग्रहण करण्याची कला येणे हीच आयुष्याची साधना असते. चातुर्मासाचा आज गुरूपौर्णिमेला प्रारंभ झाला असून बुधवारपासून आयुष्यातील ९ रहस्य या विषयावर प्रवचन होईल, असे उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांनी सांगितले.

आनंदधामच्या परिसरात आयोजित समर्पण चातुर्मास २०२६ चा आषाढी पौर्णिमेला शुभारंभ झाला. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज, पूज्य आलोकऋषीजी महाराज, पूज्य तिर्थेशऋषीजी महाराज यांच्यासह साधूसाध्वीजी तसेच समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सर्व सदस्य तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

पूज्य कुंदनऋषीजी महाराज म्हणाले की, ज्याने आयुष्यात गुरू केला त्याचा उद्धार होतो. गुरूप्रती समर्पित होणे, नितांत श्रद्धा बाळगणे हे खूप मोठे वरदान आहे. गुरूमंत्र ग्रहण केल्यावर जीवनात यश मिळते. ओबडधोबड दगडाला आकार देऊन मूर्ती घडवण्याची शक्ती गुरू मध्ये असते. आचार्यश्रींसारखे गुरू आम्हाला मिळाले हे आमचे भाग्य आहे. उपाध्यायश्रींच्या सान्निध्यातील समर्पण चातुर्मास आज सुरु झाला आहे. चार महिने प्रत्येकाने आत्मकल्याण साधावे आणि जीवनात सकारात्मक परिवर्तनाचा अनुभव घ्यावा.

# मोठी स्वप्ने, स्पष्ट ध्येय आणि सातत्यपूर्ण परिश्रमच यशाचा मंत्र – विशाल बार्नबस

### अहमदनगर महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचा उत्साहात इंडक्शन सोहळा; करिअर, शिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकासावर मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जीवनात यश संपादन करण्यासाठी मोठी स्वप्ने पाहणे, स्वतःचे ध्येय निश्चित करणे आणि त्या ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रामाणिक परिश्रम घेणे अत्यंत आवश्यक आहे. महाविद्यालयीन जीवन हे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशाचा भक्कम पाया असतो. त्यामुळे या कालावधीत शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर देण्याचे आवाहन भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे सचिव विशाल बार्नबस यांनी केले.

अहमदनगर महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या नवागत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या इंडक्शन (स्वागत) समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. रजनीश बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी संस्थेचे सचिव विशाल बार्नबस, प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. विलास नाबदे, अहमदनगर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने नवागत विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ख्रिस्तवासी रेव्ह. डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक पारंपरिक नृत्याने उपस्थित विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या सांस्कृतिक सादरीकरणामुळे सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रास्ताविक करताना कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यांनी संस्थेचे संस्थापक डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे आणि त्यांच्या पत्नी रूथबाई हिवाळे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत महाविद्यालयाची समृद्ध शैक्षणिक परंपरा, उत्कृष्ट निकालांची परंपरा, शिस्तप्रिय वातावरण, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, विविध अभ्यासक्रम तसेच एका शैक्षणिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उपलब्ध प्रत्येक संधीचा लाभ घेत स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांमधील विविध अभ्यासक्रमांची माहिती देत भविष्यातील करिअरच्या असंख्य संधींबाबत मार्गदर्शन केले. बदलत्या शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात स्पर्धा वाढत असल्याने विद्यार्थ्यांनी योग्य नियोजन, अभ्यासातील सातत्य आणि कौशल्य विकासावर भर देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यानंतर विविध शाखांतील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना आपल्या-आपल्या विभागाची सविस्तर ओळख करून दिली. कला विभागाचे प्रा. केतन औटी, वाणिज्य विभागाचे प्रा. संकेत तुपे आणि विज्ञान विभागाचे प्रा. दत्तात्रय शिंदे यांनी शाखांचे स्वरूप, अभ्यासक्रम, करिअरच्या संधी, स्पर्धा परीक्षांची तयारी, संशोधनाच्या संधी, व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यविकास आणि महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

# पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेच्या वतीने अमरधाम येथे वृक्षारोपण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कोरोना काळात रुग्णांना प्रचंड प्रमाणात ऑक्सिजनची कमी जाणवली आहे.तसेच सध्याचे वाढते तापमान ४२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले होते.शहरातील वाढते प्रदूषण कमी व्हावे.व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष संवर्धन काळाची गरज आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत आहे.पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देववृक्ष लागवड व संवर्धन अभियानांतर्गत कडूलिंब, करंजी, वड, जांभूळ, आवळा,सोनचाफा,बहावा या देववृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.पावसाळ्यात वृक्षारोपण केल्याने रोपे रुजतात.यासाठी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.असे आवाहन पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते वसंत लोढा यांनी केले आहे.

नालेगाव येथील अमरधाम येथे पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्थेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त विलास नंदी यांच्या संकल्पनेतून व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट चे संस्थापक वसंत लोढा,सचिव बाळासाहेब भुजबळ,कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, किशोर गांधी,महावीर कांकरिया,विलास नंदी,निलेश चिपाडे,उदय अनुभुले, सोमनाथ कुर्हे,अनुलोम संस्थेचे अमोल अवस्थी,हरियाली चे सुरेश खामकर आदी उपस्थित होते.

# गुरु-शिष्य परंपरेचा जागर : ज्ञानसंपदा शाळेची भव्य शोभायात्रा उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ‘‘गुरु-शिष्य परंपरा‘‘ या संकल्पनेवर आधारित भव्य शोभायात्रा रविवार दिनांक २६ जुलै रोजी मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली. भारतीय संस्कृती, अध्यात्म, पर्यावरण संवर्धन, वाचन संस्कृती, स्वच्छता आणि योगाचे महत्त्व यांचा प्रभावी संदेश या शोभायात्रेतून देण्यात आला.

शोभायात्रेचे उद्घाटन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर मा. ज्योती गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. गंगा उद्यान येथून प्रारंभ झालेली शोभायात्रा आकाशवाणी, प्रोफेसर चौक, कुष्टधाम रोड, भिस्तबाग चौक मार्गे भिस्तबाग महाल येथे पोहोचली. समारोप प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक पसायदान सादर केले.

शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे गुरु-शिष्य परंपरेवर आधारित विविध देखावे व रथ. ब्रह्मा-विष्णू-महेश, सप्तऋषी, श्रीरामवशिष्ठ, संत ज्ञानेश्वरनिवृत्तीनाथ, छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज, श्रीकृष्णसांदीपनी, रामकृष्ण परमहंसस्वामी विवेकानंद यांचे प्रेरणादायी देखावे, तसेच योगासनाचे महत्त्व नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. तसेच राज्यस्तरीय क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळविणाऱ्या खेळाडूंचा गौरव करणारा रथही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक व सांस्कृतिक नृत्य, लेझीम, झांज पथक, स्वसंरक्षणासाठी लाठी-काठी प्रात्यक्षिके, योगासनांचे सादरीकरण, वारकरी वेशभूषा, बैलगाडी रथ, विठ्ठल-रुक्मिणी पालखी, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी आदी माध्यमांतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. पर्यावरण संवर्धन, वाचन संस्कृती आणि स्वच्छतेचा प्रभावी संदेशही यावेळी देण्यात आला.

या शोभायात्रेला पालक, नागरिक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संपूर्ण मार्गावर शिस्तबद्ध नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षिततेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. यासाठी पोलीस विभाग तसेच महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीणजी बजाज, उपाध्यक्ष मिलिंदजी गंधे, स्कूल कमिटीचे चेअरमन कारभारी भिंगारे, मानद सचिव अरुणजी कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, विश्वस्त श्रीहरी टिपूगडे, विनोद बजाज, शरदजी कुलकर्णी, सुहास मुळे, दिनेश अग्रवाल, सुमित सोनवणे, वरूण भगत, अक्षय वाघमोडे, अमित सोनवणे, रोहन बजाज, सुहास भिंगारे, गौरव गंधे, गौतम गंधे अमेय कुलकर्णी,अनिरुद्ध बोपर्डीकर, प्रितेश बजाज, निनाद टिपुगडे, डायरेक्टर डॉ. सुनिता भागवत,परिवारासह उपस्थित होते. तसेच भाजप शहराध्यक्ष अनिल मोहिते, विचार भारती मंचचे रवींद्र मुळे आणि जडणघडण मासिकाचे संपादक व ज्येष्ठ व्याख्याते डॉ. सागर देशपांडे, श्री महेंद्र गंधे, नगरसेवक अजिंक्य बोरकर, यांनी शोभायात्रेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर यांच्या उत्तम मार्गदर्शनाने तसेच कैलास जाधव (मराठी-हिंदी विभाग) यांच्या नियोजनाने कार्यक्रम यशस्वी पार पडला. तसेच ज्ञानसंपदा शाळेचे सर्व उपक्रमशील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

भारतीय संस्कृती, गुरु-शिष्य परंपरा आणि सामाजिक मूल्यांचे संवर्धन करणारी ही शोभायात्रा नागरिकांच्या मनावर कायमची छाप उमटवून गेली.

# गणित विषय सोपा करण्यासाठी अबॅकस शिक्षण गरजेचे – रमाकांत काठमोरे

## इन्स्पायर अबॅकस अँड वेदिक मॅथ अकॅडमीची राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांमध्ये गणिताची भीती दूर करून त्यांना झटपट व अचूक गणित सोडविण्याची क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने इन्स्पायर अबॅकस अँड वेदिक मॅथ अकॅडमी आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडली. नगरकल्याण रोडवरील सुखकर्ता लॉन येथे झालेल्या या स्पर्धेत राज्यासह देशभरातील ८७७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

अकॅडमीच्या संचालिका अर्चना शेळके, सत्यशिला भद्रे आणि दादासाहेब शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठमोठी गणिते अवघ्या पाच मिनिटांच्या आत अचूक सोडवून उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या वेगवान गणनकौशल्याने पालक व उपस्थित मान्यवर प्रभावित झाले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथील सहसंचालक रमाकांत काठमोरे हे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''शालेय जीवनात गणित विषय सोपा व रंजक करण्यासाठी अबॅकस शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता, एकाग्रता, स्मरणशक्ती आणि तार्किक विचारक्षमतेच्या विकासासाठी अबॅकस व वैदिक गणित ही काळाची गरज आहे.'' देशभरातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून इन्स्पायर अबॅकस अँड वेदिक मॅथ अकॅडमी करत असलेल्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे यांची विशेष उपस्थिती लाभली. राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या आराध्या भाग्यवंत हिला ३ रुपयाचा धनादेश देऊन गौरविण्यात आले. तसेच राजवीर परदेशी, श्रावणी काळे, एस. हासीनी आणि साहिल मिंड या चॅम्पियन विद्यार्थ्यांना स्मार्ट वॉच प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पूजा पाटील, अनुष्का सोनवणे, वेदिका सायंबर, रिद्धी कासार, स्नेहल परकाळे, शिवतेज जाधव, स्वरा खंडागळे, जोया हवालदार, ऐश्वर्या सायंबर, पूर्वा बेदरे, सार्थक गोरे, शिवश्री व्यवहारे, शिवांश खंदारे, शौर्य जाधव, शिवतेज धराडे, आराध्या भाग्यवंत, प्रेरणा वाबळे, सोहम खंडागळे, नियती भागवत, पवनी कारंडे, अली काझी आणि अर्णव कर्डीले या विद्यार्थ्यांना चॅम्पियन ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी अकॅडमीतील उत्कृष्ट कार्याबद्दल सोमनाथ बोचरे यांना स्टार टीचर अवॉर्ड, तर प्रतिक्षा बर्डे, संपदा काटे, सविता ठोंबरे, सोनाली मानोरकर आणि क्षितिजा वाघ यांना बेस्ट टीचर अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास आष्टी पंचायत समितीचे माजी उपसभापती गोपाळभाऊ रकटाटे, माजी कृषी अधिकारी बलभिम शेळके, पांडुरंग माढेकर, माणिकराव विधाते, संतोष यादव, अमोल घोलप, ज्ञानदेव पांडुळे, लाभेश रणसिंग, शिवाजी लंके, सुनिल पंडित, भाऊसाहेब कबाडी, गजेंद्र राठोड, नामदेव रकटाटे, बाजीराव अनभुले, विद्या यादव, पंगा शाम मुथैय्या, कोला राजय्या वेणू, शरद वाळके, कृष्णा पवार आदी मान्यवरांसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनता विद्यालयाची गुणवत्ता कौतुकास्पद – मुकेश मुळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जनता विद्यालयातील शैक्षणिक, कला, क्रीडा व विविध स्पर्धा परीक्षांमधील यश सर्वांगीणदृष्ट्या कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार जिल्हा मराठा संस्थेचे सहसचिव श्री मुकेश मुळे यांनी काढले.

विद्यालयातील विविध स्पर्धा परीक्षांमधील , कला व क्रीडा स्पर्धांमधील विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन विद्यालय स्तरावर करण्यात आले होते. यावेळी जिल्हा मराठा संस्थेचे सदस्य डॉ. धनंजय वाघ, सौ. अलकाताई मुळे,डॉ. सौ.सुमा वाघ, बाळासाहेब दरंदले, बिभीषण सपाटे,प्राचार्य श्री दत्ता पाटील नारळे,पर्यवेक्षिका सौ तारा पाडळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मागील शैक्षणिक वर्षात पार पडलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

इ. आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सात विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून कु. वाबळे ज्ञानेश्वरी पोपट हिने २६२ गुण मिळवून जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे.

इ. आठवी एन एम एम एस परीक्षेत तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून त्यांना प्रत्येकी ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. इयत्ता सहावी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून कुमारी गोरे आराध्या नवनाथ हिने २९४ मिळून जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

इयत्ता सातवी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत चार विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून ज्ञानवर्धिनी परीक्षेत कु. म्हस्के स्नेहल नवनाथ हिने २९६ गुण मिळवून प्रथम क्रमांक, कुमारी जगदाळे समीक्षा सोमनाथ द्वितीय क्रमांक, चिरंजीव बेरड कार्तिक सुरेश सहावा क्रमांक तर उकांडे प्रथमेश ज्ञानेश्वर याने जिल्ह्यात तेरावा क्रमांक मिळवला आहे. गणित प्राविण्य परीक्षेत दोन गणित प्रज्ञा परीक्षेत एक असे तीन विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले आहेत.

नुकत्याच जाहीर झालेल्या सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकालात विद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

एलिमेंटरी ग्रेड ड्रॉईंग परीक्षेत अ श्रेणीत दहा विद्यार्थी ब श्रेणीत बारा विद्यार्थी तर इंटरमिजिएट ग्रेड ड्रॉइंग परीक्षेत अ श्रेणीत सात,ब श्रेणीत सहा विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहे.

विविध क्रीडा स्पर्धा प्रकारांमध्ये राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा १४ वर्षे वयोगटात ४ मुलींची, राज्यस्तर खो-खो स्पर्धा १८ वर्षे वयोगटात ५ मुलींची, राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा पुरुष व महिला यामध्ये ५ खेळाडूंची निवड झाली आहे. १७ वर्षे वयोगट शालेय विभागीय खो-खो स्पर्धेत संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे, जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धे अंतर्गत धावण्याच्या शर्यतीत ३ मुलींची निवड झाली होती. या सर्व बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे श्री सुनील म्हस्के,दिनकर मुळे, संजय कोतकर, सचिन काळे, अर्चना कोहक, प्राजक्ता गीते, लक्ष्मीकांत गोरे, कविता उगले, स्वाती गोरे, धनश्री मानकर, उल्का गुंड, सागर भोईटे, स्वाती हरिश्चंद्रे,शारदा पाटील, भाऊसाहेब पवार, संभाजी जगदाळे, प्रमोद अमृते, माधुरी लवांडे, सुनंदा राशिनकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.


# फिरोदिया शिवाजियन्सने पटकाविला सरपंच चषक

## फुटबॉल स्पर्धेतील सर्व पाच सामने जिंकून मिळवले विजेतेपद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गणेश मित्र मंडळ, सैनिक नगर आयोजित सरपंच चषक फुटबॉल स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने अंतिम सामन्यात सुमन एफसीचा ३-० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. भुईकोट किल्ला जवळील मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत शहरातील फुटबॉलच्या संघांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

लीग कम नॉकआऊट पद्धतीने झालेल्या या स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने साखळी फेरीतील तीन्ही सामने जिंकून आपल्या गटात अव्वल स्थान मिळवले. उपांत्य फेरीत सॉकर क्लबचा ४-० असा दणदणीत पराभव करत संघाने अंतिम फेरी गाठली. अंतिम




सामन्यात सुमन एफसीवर ३-० असा विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात मयूर गोरखा, दर्शन पवार आणि सूरज शर्मा यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. फिरोदिया शिवाजियन्स एफसीने स्पर्धेतील सर्व पाच सामने जिंकले. विशेष म्हणजे संपूर्ण स्पर्धेत संघाने एकही गोल न स्वीकारता विजेतेपद मिळवले.

बक्षीस वितरण सरपंच विजय खोमणे आणि फरताळे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुशील लोट, राकेश घावरी, सचिन वाल्मिकी आणि सनी वाघेला यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या उत्कृष्ट नियोजन आणि मेहनतीमुळे स्पर्धा अतिशय शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडली. या यशाबद्दल फिरोदिया शिवाजियन्स एफसीच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# नीट प्रकरणी खासदार नीलेश लंके यांची एनटीए कार्यालयास भेट

## विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी तातडीने कारवाईची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नीट परीक्षेतील पेपरफुटी, निकालातील विसंगती आणि विद्यार्थ्यांच्या गुणांमधील घोळ या गंभीर विषयांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी नवी दिल्ली येथील नॅशनल टेस्टिंग एजन्सी ( एनटीए ) कार्यालयास भेट देऊन एनटीएचे प्रशासन संचालक विजयकुमार पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत नीट परीक्षेच्या निकालाशी संबंधित विविध तक्रारी, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, गुणांमधील कथित विसंगती, निकालाबाबत निर्माण झालेला संभ्रम आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित गंभीर प्रश्न अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.



खासदार लंके यांनी विद्यार्थी आणि पालकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचा संदर्भ देत संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळबद्ध चौकशी करण्याची मागणी केली. ज्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली आहे, त्यांच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन न्याय मिळेल, अशा ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, असा आग्रह त्यांनी धरला.

यावेळी परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविणे, विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कायम ठेवणे आणि तक्रार निवारण प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याबाबतही चर्चा झाली.

बैठकीनंतर खासदार निलेश लंके यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. नीट संदर्भातील प्रत्येक तक्रारीची सखोल आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. पात्र विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत. शेवटच्या विद्यार्थ्याला न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील.

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या प्रकरणात एनटीएने तातडीने योग्य निर्णय घेऊन परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करावा, अशी अपेक्षाही खासदार लंके यांनी व्यक्त केली.

# पारनेरच्या मनसैनिकांचा आटीओ कार्यालयात ठिय्या आंदोलन

## लिखित कारवाईचा अहवाल मिळेपर्यंत उठणार नाही – मनसे नेते अविनाश पवार यांची आक्रमक भूमिका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर तहसीलदारांच्या शासकीय गाडीवरील काळ्या काचा काढून कारवाई न केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेना, पारनेर तालुका च्या वतीने आज उप अधीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्या नगर यांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले.

मनसे तालुका अध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनात आंदोलकांनी जोपर्यंत जिल्ह्यातील सर्व शासकीय वाहनांवरील काळ्या काचांवर कारवाई होत नाही तोपर्यंत कार्यालयातून उठणार नाही अशी ठाम भूमिका घेतली.



यावेळी उप अधीक्षक मा. माधव सूर्यवंशी यांनी आंदोलकांची भेट घेऊन ''उद्या लेखी स्वरूपात खुलासा देऊ'' अशी विनंती केली. मात्र आंदोलकांनी त्यांची विनंती धुडकावून लावली. ''सामान्य माणसाला तुम्ही रस्त्यावर वेळ देता का?'' असा सवाल करत पवार यांनी खडे बोल सुनावले. सूर्यवंशी साहेबांनी मिटिंगचे कारण देत ''मी जातो, तुम्हाला कारवाई करू'' असे सांगितले. त्यावर पवार यांनी ''तुम्ही जा, पण जोपर्यंत कारवाईचा लिखित पुरावा आमच्या हात देत नाही तोपर्यंत आम्ही इथून उठणार नाही'' अशी आक्रमक भूमिका घेतली. अखेर प्रशासनाने कारवाईचे आश्वासन दिले. परंतु मनसेने लिखित अहवाल मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# सेवा निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे अयोग्य- शालिनीताई विखे पाटिल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आयुष्यातील ३३ वर्षांपेक्षा जास्त कालावधी शासकीय सेवेत काम करणाऱ्या कर्मचारी वर्गास सेवा निवृत्तीचे नियमीत वेतन विहित वेळेत मिळत नसल्याबाबत शालिनीताई विखे पाटिल यांनी खंत व्यक्त केली. सेवानिवृत्ती वेतनाचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे आयोग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात ग्राम विकास अधिकारी म्हणून ३३ वर्षे सेवा करणारे श्री. एस.एफ. शेख यांनी शालिनीताई विखे पाटिल यांची भेट घेतली श्री. एस.फ.शेख हे शिराळ चिचोंडी, ता. पार्थडी येथील रहिवासी आहेत. त्यांनी ३३ वर्षे जिल्हा परीषद सोलापूर येथे सेवा केली. त्यांना सेवानिवृत्त होऊन ४ वर्षे झाली तरीही त्यांना सेवा निवृत्ती नियमीत वेतन आणि इतर देय लाभ अप्राप्त असलयाबाबतचा प्रश्न त्यांनी शालिनीताई विखे पाटिल यांच्याकडे मांडला त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरीता तात्काळ शालिनीताई विखे पाटिल यांनी सोलापूर जिल्हा परीषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दुरध्वनी वरुन श्री. एस.एफ. शेख यांच्या सेवा निवृत्तीबाबतचा विषय सांगितला.

तसेच त्या विषयाची तात्काळ सोडवनूक करुन श्री. शेख यांना नियमाप्रमाणे नियमीत सेवा निवृत्ती वेतन आणि इतर देय लाभ अदा करणे बाबत योग्यती जलद कार्यवाही करण्याचे सुचित केले. याबाबत अतिरीक्त मूख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर यांनी तात्काळ श्री. शेख यांच्याची संपर्क साधून येऱ्या गूरूवारी चर्चा करण्याकरीता सोलापूर येथे बोलावीले आहे. येवढ्या जलद शालिनीताई विखे पाटिल यांनी कारवाई केल्याचे पाहून श्री. शेख यांच्या भावना दाटून आल्या. त्यांना इतक्या लवकर कारवाई होईल अशी अपेक्षा नव्हती. तदनंतर त्यांनी शालिनीताई विखे पाटिल यांचे आभार मांडले. त्यांच्या बरोबर माझी नगरसेवक आसिफ सूल्तान आणि श्री. रफिक मुन्शी उपस्थित होते.

(पान १ वरून)

## घासगल्ली येथील घरसंसार दुकानात ग्राहकाला मारहाण

प्रयत्न केला असता, या चौघांनी तिलाही मारहाण केली. झटापटीत तिच्या गळ्यातील गंठण ओरबडून घेतले. दरम्यान, या मारहाणीत त्यात हा ग्राहक जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी सिव्हीलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी चौघाजणांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## एकाच दिवसात ४४६ वाहनांवर कारवाई, चार लाखांचा दंड वसूल

मोहिमेदरम्यान फॅन्सी व नसलेल्या नंबर प्लेट्स, लायसन्स नसणे, ट्रिपल सीट, वाहनांना काळ्या काचा, मॉडिफाय सायलेन्सर, ड्रिंक अँड ड्राईव्ह, अल्पवयीन चालकांकडून वाहन चालवणे आणि मोबाईलवर बोलणे अशा विविध प्रकारच्या नियमभंगांवर थेट कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम पार पडली. यात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखान्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील आणि भिंगार कॅम्पच्या साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थारोत यांच्या पथकांनी सहभाग घेतला.

## श्री जवळेश्वर देवस्थानाला तीन कोटी रुपये निधी मिळणार

राज्य निकष समितीने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी घेतलेल्या बैठकीत या प्रस्तावांची सविस्तर छाननी करून त्यांना मंजुरी दिली होती, त्यानंतर शासन निर्णय आणि आता ३ कोटी रुपये निधीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आल्याने या भागातील धार्मिक पर्यटनाला आणि स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळणार आहे. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या या विकासवादी भूमिकेमुळे आणि यशस्वी पाठपुराव्यामुळे कर्जत-जामखेडमधील तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असून, या निर्णयाचे संपूर्ण जिल्ह्यातून स्वागत आणि कौतुक होत आहे तसेच भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. लवकरच कर्जत तालुक्यातील श्री जगदंबा देवस्थानाला (कुळधरण) आणि श्री लालगीर बुवा मठ ट्रस्टला (मांदळी) या दोन देवस्थानांना देखील निधी उपलब्ध होणार आहे.

## जिल्ह्यात १० अवैध दारू विक्रेते, ११ अवैध जुगार अड्ड्यांवर छापे

अनंत सालगुडे, संदीप दरवडे आणि सहकाऱ्यांचे तीन विशेष पथक तयार करून ही कामगिरी फत्ते केली. दिनांक २८ जुलै रोजी केलेल्या या कारवाईत १० अवैध दारू विक्रेत्यांवर छापे टाकून १ लाख ८ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर ११ जुगार अड्ड्यांवर कारवाई करत २४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दारू छापे (१० गुन्हे) – भिंगार कॅम्प (१), अकोले (४), शेवगाव (५).जुगार छापे (११ गुन्हे)– तोफखाना (४), भिंगार कॅम्प (४), अकोले (२), शेवगाव (१). याप्रमाणे कारवाई करण्यात आली.

## श्रीरामपूर परिसरातील अवैध धंद्यांवर एलसीबीकडून छापे

भगवान थोरात, रमिझराजा आतार आणि विशाल तनपुरे यांच्या पथकाने २८ जुलै रोजी ही धडक कारवाई केली.जुगार विरोधी कारवाईत घरकुल अक्षय कॉर्नर येथील अरुण बोरुडे, दीपक यादव आणि सचिन नवले यांना ताब्यात घेण्यात आले. स्वामी परदेशी व अश्पाक जाहगीरदार हे दोघे फरार झाले. संगमनेर रोड परिसरामध्ये केलेल्या कारवाईत रवींद्र गायकवाड यास अटक करण्यात आली, तर अश्पाक जाहगीरदार फरार झाला. बेकायदेशीर दार विक्रीवरील कारवाईत गोंधवणी रोडवरील जय भोले चौक येथे नितेश कंत्रोड याच्याकडून देशी-विदेशी दारूच्या बाटल्या व वाहनासह ५ लाख १८ हजार ४३५ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

## लायन्स इंटरनॅशनलच्या युवा सांस्कृतिक देवाणघेवाण उपक्रमांतर्गत परदेशातील चार युवा प्रतिनिधी अहिल्यानगरात

ओळख करून देण्यासाठी त्यांना पारंपरिक ढोल-पथकाचे सादरीकरण दाखविण्यात आले. सावेडी येथील दिंडीत त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला तसेच स्थानिक महिलांसोबत फुगडी खेळून मराठी संस्कृतीचा आनंद लुटला. भारतीय पाहुणचार, स्थानिक खाद्यपदार्थ, लोककला आणि सामाजिक एकात्मतेचा अनुभव घेताना सर्व विदेशी युवकांनी विशेष आनंद व्यक्त केला.

या अभ्यासदौऱ्याच्या पुढील टप्प्यात हे प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर, जागतिक वारसा स्थळ वेरूळ लेणी, शिर्डी, श्री शनिशिंगणापूर आणि श्रीक्षेत्र देवगड येथे भेट देणार आहेत. त्यानंतर भारतातील विविध राज्यांमध्ये आलेल्या ३८ आंतरराष्ट्रीय युवा प्रतिनिधींसोबत दिल्ली, जयपूर, आग्रा आणि मुंबई या शहरांच्या सांस्कृतिक अभ्यासदौऱ्यात सहभागी होऊन भारताच्या विविधतेचा, इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभ्यास करणार आहेत.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आदित्य छाजेड, गुरनूरसिंग वाधवा, सई काळे, दिपेश कोठारी, डॉ. सिमरनकौर वाधवा, प्रणिता भंडारी आणि भावना छाजेड हे सातत्याने विशेष परिश्रम घेत असून, विदेशी पाहुण्यांच्या निवास, प्रवास, सांस्कृतिक कार्यक्रम आणि दैनंदिन समन्वयाची जबाबदारी ते अत्यंत आत्मीयतेने सांभाळत आहेत.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, सचिव हरीश हरवानी, कोषाध्यक्ष विजय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. तसेच माजी अध्यक्ष संजय आसनानी, प्रशांत मुनोत, दिलीप कुलकर्णी आणि धनंजय भंडारे यांचेही या उपक्रमासाठी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे. विविध देशांतील युवकांना भारतीय संस्कृती, अध्यात्म, सामाजिक मूल्ये आणि ''अतिथी देवो भव'' या परंपरेचा प्रत्यक्ष अनुभव देत जागतिक मैत्री, सांस्कृतिक सलोखा आणि आंतरराष्ट्रीय बंधुभाव अधिक दृढ करण्याचा हा उपक्रम लायन्स इंटरनॅशनलच्या सेवाभावी कार्याचा उत्कृष्ट नमुना ठरत आहे.